# प्रेसनोट

जा.क्र. १९१/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांकः– १३/ ०४/२०१८

## जातीय सलोखा समीती बैठक

भंडाराः– भंडारा जिल्हा पोलीस दलातर्फे पोलीस मुख्यालय येथील बहुउद्देशीय सभागृह येथे दिनांक १२/०४/२०१८ रोजी जिल्हास्तरीय जातीय सलोखा समीतीच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले, सदर कार्यक्रमा प्रसंगी विनीता साहु पोलीस अधीक्षक ,अप्पर पोलीस अधीक्षक रश्मी नांदेडकर, यांचे उपस्थीतीत कार्यक्रमाची सुरूवात हे रोपटे देवुन स्वागत समारंभानी झाली .

सदर कार्यक्रमात प्रमुख पाहुने सुजाता गंधे उपविभागीय अधीकारी भंडारा, ज्ञानेवश्री आहेर उत्पादन शुल्क विभागाच्या अधीक्षक, बि.ए. हिवरकर महावितरणचे कार्यकारी अभियंता, श्री. सुनिल मेंढ भंडारा शहर नगराध्यक्ष, तसेच श्री. जोगदंड उपविभागीय पोलीस अधीकारी भंडारा , श्री. टक्कस उपविभागीय पोलीस अधीकारी पवनी, श्री. डिसले उपविभागीय पोलीस अधीकारी साकोली, इंत्यादी मान्यवर कार्यक्रमाला उपस्थीत होते.

आगामी वर्ष हे निडणुकीचे असुन या काळात नागरीकांनी शांततेचे व संयमाचे दर्शन घडवीने आवश्यक आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती व बौध्द पौर्णीमा निमीत्त जिल्हयात काढण्यात येतात महाराष्ट्र स्थापना दिवस शासकीय –निमशासकीय कार्यालये व महाविदयालत साजरा केला जातो. या उत्सवादरम्यान शांतता कायम टिकवुन राहावी जाती धर्ममध्ये भेद निर्माण होवुन नये, धार्मीक भावना दुखावल्या जावु नये याकरीता शांतता पुर्ण वातावरण कायम राखण्यासाठी जनतेच्या सहकार्याची आवश्यकता असल्याचे मा. विनीता साहू पोलीस अधीक्षक भंडारा यांनी सदर बैठकीत बोलतांना सांतिले.

सदर बैठकीत जिल्हयातील विवध भागातुन आलेले श्री. शिवनकर, श्री. हिवराज ऊके, श्री.राशीद कुरेशी , श्री. अमृत बंन्सोड, श्री. आशिष बागडे, श्री. गफार अकबानी, श्री. राहुल डोंगरे, श्री. महेद्र गडकरी, बालु चुन्ने हे सर्व सामाजीक कार्यकर्ते यांनी आपल्या क्षेत्रातील विवध, समस्या संबधात प्रश्न उपस्थीत केले. त्यावर श्री. मा. पोलीस अधीक्षक, उपविभागीय अधीकारी भंडारा, अधीक्षक राज्य उत्पादन शुल्क भंडारा, कार्यकारी अभियंता, महावितरण भंडारा,यांचे कडुन उपस्थीत प्रश्नाचे निराकरण करण्यात आले.

उत्सवा दरम्यान बऱ्याच वेळा अफवा पसरवील्या जातात त्यामुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होतो, अशा वेळी जनतेनी सतर्क राहावे, अफवावर विश्वास ठेवुन नेये. त्याच प्रमाणे सोशल मिडीया वर पसरवीण्यात येणाऱ्या संदेशाची खात्री केल्या शिवाय ते पुढे पाठवु नेये सर्व उत्सवा काळात डि.जे वर न्यायालयाने मर्यादा घातलेल्या आहेत. त्या मर्यादापेक्षा अधीक राहुनच डि.जे. वाजवीण्यात यावा यासाठी पोलीस विभागाची परवानगी आवश्यक आहे. त्यात पोलीस विभागाकडुन भेदभाव केला जात नाही आगामी येणारे सन– उत्सव शांततेत पार पाडण्यासाठी नागरीकांनी जातीय सलोखा समीतीचे ॲम्बेसेडर म्हणुन काम करावे असे आवाहन विनीता साहु पोलीस अधीक्षक भंडारा यांनी केले.

श्री. सुनिल मेंढे नगराध्यक्ष नगर परीषद भंडारा यांनी उत्सवाला गालवोटा लावु नये समाजात जातीय सलोखा कायम राहावा याची खबरदारी घेण्याची जबाबदारी सर्वांची असल्याचे सांगितले तसेच जातीय सलोखा समीतीच्या उपस्थीत सदस्यांनी आपले मनोगत व्यक्त करून सन– उत्सव शांततेत पार पाडण्यासाठी नागरीकांचे सहकार्य आवश्यक असल्याचे सांगितले .

सदर कार्यक्रमाला उपस्थीत पोलीस स्टेशनचे/शाखेचे पोलीस अधीकारी व कर्मचारी, जिल्हा परीषद,पंचायत समीती सदस्य, जातीय सलोखा समितीचे सदस्य, दक्षता समीती सामाजीक कार्यकर्ते तसेच पत्रकार बंधु व ईतर मान्यवर उपस्थीत होते, कार्यक्रमाचे संचालन सपोनी. आढोळे तसेच कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन पोलीस अधीक्षक (गृह)भंडारा यांनी केले

पोलीस अधीक्षक कार्यालय भंडारा (म.रा.)

(एस.आर.तेलुर)
जि.वी.शा. भंडारा
दुरध्वनी क्र.९९८७३८५४०५

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत:** संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.